पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८
बक्षे/१/कावि/११३२ / २०१५
दिनांक -/ १२ / २०१५

प्रति,
१)कार्यकारी अभियंता /उपअभियंता
स्थापत्य/विद्युत /पा.पु/ ब क्षेत्रिय कार्यालय
२)सहा. आरोग्यधिकारी, आरोग्य विभाग ब क्षेत्रिय कार्यालय

विषय- सफाई कामगार यांनी सार्वजनिक सुट्टी /साप्ताहिक सुट्टी दिवशी पूर्वपरवानगीने उपस्थित रहाणेबाबत व कार्यालयीन शिस्तीबाबत

परिपत्रक

कार्यालयीन कामकाजाचे सोईच्या दुष्टीने ब क्षेत्रिय कार्यालय प्रशासन व इतर उपविभागामध्ये सफाई कर्मचारी कामकाज करीत आहेत. सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टीचे दिवशी कार्यालये बंद असतात. परंतु सफाई कामगार सदर सुट्टीचे दिवशी कार्यालयात येऊन थंम्ब इप्रेशन करीत असतात. सदर बाब नियमाधिन व प्रशासकीय शिस्तीचा भंग करणारी आहे.

तथापि या परिपत्रकाव्दारे सर्व ब क्षेत्रिय कार्यालय शाखा प्रमुख यांना कळविणेत येते की सार्व/साप्ताहिक सुट्टी दिवशी कार्यालय बंद असल्याने सफाई कर्मचारी यांनी शाखा प्रमुख यांचे लेखी आदेशा शिवाय कार्यालयात उपस्थित राहू नये (थंम्ब इम्प्रेशन करु नये ) असे आढळून आलेस त्या सार्व/सात.सुट्टीचे दिवसाचे नियमानुसारचे देय वेतन काढणेत येणार नाही. यासंबंधीची सर्व जबाबदारी अस्थापना लिपीक /मुख्यलिपीक/व शाखाप्रमुख यांची राहील. त्याचप्रमाणे साईडवर कामकाज करणारे कर्मचारी यांनी ऑन ड्युटी वैयक्तीक कामासाठी म.न.पा.चे कोणत्याही कार्यालयात व ब क्षेत्रिय कार्यालयातील इतर विभागात पूर्वपरवानगी शिवाय जावू नये आणि ऑन ड्यूटी सोडून वैयक्तिक कामासाठी म.न.पा. चे कोणत्याही कार्यालयात गेल्याचे आढळून आल्यास त्या कर्मचा-यां विरुध्द नियमाधिन कार्यवाही संबंधित शाखाप्रमुख यांनी करावी.

क्षेत्रिय अधिकारी
ब क्षेत्रिय कार्यालय
चिंचवड-३३

प्रत-मा.सहा.आयुक्त(प्रशासन )
पिं.चिं. म.न.पा.